श्री. राजेश रमेश गायकवाड, शिक्षणाधिकारी यांच्या सेवा समाप्त करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: इएसटी-३९१६/प्र.क्र.२५७/प्रशा-२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २४ सप्टेंबर, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २१.१०.२०१० रोजी शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर सरळसेवने ७४ पदांवर नियुक्ती देण्याकरीता जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यानुसार आयोगाने परीक्षा घेऊन दिनांक १६.०२.२०१३ च्या पत्राद्वारे पात्र उमेदवारांची शिफारस शासनाकडे पाठविली होती. त्यानुसार उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र व सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या तपासणीच्या अधिन राहून दिनांक ०८.०८.२०१३ च्या शासन निर्णयाद्वारे एकूण ६८ उमेदवारांना शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. दिनांक १२.०८.२०१३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये अधिकाऱ्यांचा मूळ प्रवर्ग, ज्येष्ठता क्रमांक तसेच नियुक्तीकरीता दिलेला प्रवर्ग यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

२. शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (प्रशासन शाखा) या पदावर सरळसेवेच्या कोटयातील लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांना पदस्थापना देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक ०८.०८.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये अ.क्र.६ येथे खालील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे :-

" महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संबंधित उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे संबंधित सक्षम यंत्रणेमार्फत तपासण्याच्या सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे तपासणीअंती उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्र खोटी अथवा बनावट आढळल्यास त्यांच्या सेवा कुठलीही पूर्वसूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येतील"

३. दिनांक ०८.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये श्री. राजेश रमेश गायकवाड (अ.क्र.६७ आयोगाच्या शिफारशीमधील क्र.७० व प्रवर्ग अ.जा) यांना प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, पुसेगाव पदावर नियुक्ती देण्यात आली होती. श्री. राजेश गायकवाड यांचे जात वैधता प्रमाणपत्राबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याकारणाने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी अद्याप पूर्ण करण्यात आलेला नाही.

४. श्री.राजेश रमेश गायकवाड यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अनुषंगाने उपसंचालक तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक ११.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर समितीच्या दिनांक २२.०६.२०१६ च्या निर्णयान्वये श्री. राजेश गायकवाड यांचे ठाकर, अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग पुणे यांनी श्री. राजेश गायकवाड यांच्या ठाकर, अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यासंदर्भात दिनांक २२.०६.२०१६ च्या निर्णयान्वये खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत -

"सदर समितीने दिनांक ०६.०३.१९९५ रोजीच्या निर्णयान्वये श्री. गायकवाड यांचा ठाकर, अनुसूचित जमातीचा दावा अवैध केलेला असून त्याविरुध्द् श्री. गायकवाड यांनी दाखल केलेली रिट याचिका क्र. २६६४/१९९५ ही दिनांक १९.०३.२००३ रोजीच्या आदेशान्वये निकाली निघाली असल्याने या समितीचे उक्त दिनांक ०६.०३.१९९५ चे अवैधतेचे आदेश अद्याप कायम आहेत. सबब अर्जदार श्री. राजेश गायकवाड यांनी लबाडीने व फसवणुकीने पुन्हा नव्याने संबंधित उपविभागीय अधिकारी, माढा उपविभाग, कुर्डुवाडी, जि. सोलापूर यांच्याकडून दिनांक ०१.०८.२००० रोजी प्राप्त केलेला ठाकर, अनुसूचित जमातीचा दाखला याद्वारे रद्द करण्यात येत आहे. तसेच, अर्जदार श्री. राजेश गायकवाड यांनी लबाडीने व फसवणूकीने प्राप्त केलेल्या ठाकर, अनुसूचित जमातीचा दाखल्याच्या आधारे या समितीकडून दिनांक १४.०३.२००१ अन्वये लबाडीने व फसवणूकीने प्राप्त केलेले ठाकर, अनुसूचित जमातीचे जात वैधताचा प्रमाणपत्रदेखील या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे. "

५. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग पुणे यांच्या दिनांक २२.०६.२०१६ रोजीच्या आदेशाविरुध्द श्री. राजेश रमेश गायकवाड यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ९२३७/२०१६ दाखल केली. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.९२३७/२०१६ मध्ये दिनांक ०२.०७.२०१९ रोजी आदेश पारित करुन त्यांची रिट याचिका फेटाळली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ०२.०७.२०१९ रोजीच्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात एसएलपी १७१०७/२०१९ दाखल केली असून, त्यावर दिनांक २९.०७.२०१९ रोजी अंतिम आदेश पारीत झाले असून, ते खालीलप्रमाणे आहेत -

On the request of the learned counsel appearing on behalf of the petitioner, the Special Leave Petition is dismissed as withdrawn.

६. मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दिलेले उक्त आदेश पाहता, श्री. राजेश रमेश गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. बीड यांच्या सेवा समाप्ती बाबत सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :

श्री. राजेश रमेश गायकवाड यांचे ठाकर अनुसुचित जातीचे प्रमाणपत्र हे शासनसेवेत येण्यापूर्वीच अवैध ठरविण्यात आले आहे. श्री. गायकवाड यांनी दुसऱ्यांदा प्राप्त केलेले प्रमाणपत्र हे शासनाची फसवणूक करुन प्राप्त केले आहे. मा. उच्च न्यायालयाने सदरची बाब मान्य करुन अर्जदारास दोषी ठरविले असल्यामुळे श्री. राजेश रमेश गायकवाड यांच्या सेवा "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्ती जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवार्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००" मधील कलम १० (१) मधील तरतुदी नुसार सेवा समाप्त करण्यात येत आहेत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२४१२५४५१९५२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUSHIL KHODWEKAR

Digitally signed by SUSHIL KHODWEKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=1c4a8f0aafeac0a009d462f7f02d23942001d76225b9f704de26731171c8684b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=19b0ccbee5810aa5e36e9fa467a7630471d3c500ceb353fbb37bf0b6dfe0407a, ou=SCHOOL EDUCATION AND SPORT DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUSHIL KHODWEKAR
Date: 2019.09.24 12:56:44 +05'30'

(सुशील खोडवेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व संचालक,
३. शिक्षण उप संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
४. श्री. राजेश रमेश गायकवाड, (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)
५. निवड नस्ती प्रशा-२.

प्रत माहितीसाठी,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,
२. मा. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक.
३. मा. अपर मुख्य सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक.